REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X

VOLUME - 8 | ISSUE - 2 | NOVEMBER - 2018

# ‘प्रवाह’ ते ‘पडघम’ सामाजिक आणि सांस्कृतिक अनुबंध



प्रा.अनिलकुमार दडमल
मराठी विभाग प्रमुख, गुलाम नबी आझाद कला,
वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, बार्शीटाकळी, जि.अकोला

## प्रास्ताविक—

१९९० नंतरच्या मराठी कादंबरीला समृद्ध करणाऱ्या कादंबरीकारात रवींद्र शोभणे यांचे नाव प्राधान्याने घ्यावे लागते. हा काळ प्रचंड सामाजिक उलथापालथीचा काळ आहे. आधुनिकीकरणाने समाजाच्या सर्वच क्षेत्रात आमूलाग्र बदल घडवून आणला आहे. माणसाबरोबर जगण्यालाही यंत्राची गती निर्माण झालेली आहे. बदलत्या सामाजिक सांस्कृतिक आणि राजकीय वातावरणाचे पडसाद साहित्यातून तीव्रपणे उमटू लागले. यातूनच संवेदनशील मनाची अभिव्यक्ती आकार घेत गेली. या काळाला दृग्गोचर करणाऱ्या मराठीतल्या काही मोजक्या साहित्यिकात रवींद्र शोभणे यांचे नाव आवर्जून घ्यावे लागते. प्रवाह १९८३ व रक्तध्रुव १९८९ या दोन कादंबऱ्या तशा १९९० च्या अगोदर आलेल्या आहेत. परंतु कादंबरीकार म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली ती १९९२ मध्ये प्रसिद्ध झालेल्या कोंडी या कादंबरीमुळे शोभणे यांनी माणूस आणि त्याचे जगणे या विषयाला केंद्रस्थानी ठेवून आपल्या कादंबरीच्या प्रवासाला गतिमान बनविले आणि ते लोकप्रिय कादंबरीकार म्हणून नावारूपास आले. कादंबरीच्या या प्रवासात त्यांनी कथालेखनातही दिलेले योगदान अत्यंत मौलिक स्वरूपाचे आहे.

मराठी कथेच्या प्रांतात आपल्या सशक्त कथा लेखनाने दमदार पाऊल ठेवणारे रवींद्र शोभणे कादंबरीच्या प्रांतातही आपली लेखणी अत्यंत यशस्वीरीत्या मिरवताना दिसून येतात. त्यांनी मराठी कादंबरीच्या बदलत्या परिघात वैविध्यपूर्ण कादंबरी लिहून आपले वेगळे स्थान निर्माण केलेले आहे. जगण्याविषयीचे चिंतन अधोरेखित करणारा लेखक कादंबरी या प्रकारातून जीवनाचा समग्र पट मांडताना मानवी समाजात बदलत जाणाऱ्या मूल्यव्यवस्थेला तसेच नातेसंबंधांना, वृत्ती—प्रवृत्तींना आणि या पार्श्वभूमीवर जगण्याला येत चाललेल्या यांत्रिकीकरणाचे आपल्या कादंबरी लेखनातून प्रवाहीपणे मांडतात. पौराणिक विषयाला हाताशी घेऊन वर्तमान वास्तवाचे नेमके दर्शन घडविण्यात रवींद्र शोभणे यांची कादंबरी अत्यंत यशस्वी झालेली आहे. समाजकारण, राजकारण आणि बदलत्या सांस्कृतिक विश्वाच्या सभोवताली शोभणे यांची कादंबरी अत्यंत ठोसपणे उभी राहताना दिसून येते.

स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील लोकांची तत्त्वनिष्ठ आणि स्वातंत्र्योत्तर कालखंडात वाढलेली स्वार्थांध प्रवृत्ती यांच्यातील संघर्षाचे अत्यंत चांगले चित्रण शोभणे यांच्या कादंबरीतून उभे राहते. तसेच वास्तवावर त्यांची असलेली मांड, प्रचंड अभ्यासू वृत्ती, संवेदनशीलता, सामाजिक प्रश्नांचे यथायोग्य भान यांची प्रचिती येते. रवींद्र शोभणे यांच्या कादंबरी लेखनाबद्दल डॉ.नागनाथ कोतापल्ले यांनी म्हटल्याप्रमाणे हे आधुनिकतेचा मानवी जीवनावर नेमका काय परिणाम झाला याचा शोध घेणारे लेखक आहेत, याचे प्रत्यंतर त्यांच्या कादंबऱ्या वाचल्यानंतर लेखकाला आल्याशिवाय राहत नाही. समकालीन कादंबरी आणि कथेच्या क्षेत्रात शोभणे यांनी आपले वेगळे आणि वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण केले आहे.

‘प्रवाह’ ही रवींद्र शोभणे यांची पहिली कादंबरी. या कादंबरीच्या निमित्ताने कथालेखनातून शोभणे कादंबरीच्या प्रवाहाकडे वळले आहेत. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या नवलेखक अनुदान योजना अंतर्गत त्यांनी ही कादंबरी प्रसिद्ध केली. दोन स्त्रियांच्या जीवनविश्वाला प्रतिकात्मकतेने साकारणारी ही कादंबरी अत्यंत महत्त्वाची आहे. स्त्री परिस्थितीला शरण जाते. त्यामुळे उद्भवलेली परिस्थिती कशी होते,

याचे चित्रण या कादंबरीत साकार झाले आहे. रवींद्र शोभणे यांचा समाजातील स्त्रियांकडे आणि बदलत्या स्त्री व्यवस्थेकडे पाहण्याचा दृष्टिकोन या कादंबरीच्या रूपाने अभिव्यक्त होतो. लेखक समाजाकडे कसा पाहतो समाजातील समस्यांचे आकलन करून घेऊन त्याचे प्रतिबिंब तो आपल्या लेखनातून कसे साकार करतो ते त्यांच्या कादंबरी प्रवासावरून आपल्या लक्षात येऊ शकते. यानंतर पुढे रक्तद्रव ही कादंबरी साकार झाली. कथानकात मुक्त संचार असला तरी कामवासणा मध्यवर्ती विषय आहे. मानवी जीवन एखाद्या कॅनव्हास सारखे वापरले आहे. एका विलक्षण मानसिक कोंडीतून मानसिक उद्रेकाच्या जाणारा माणसाचा प्रवास रेखाटणारी ही कादंबरी म्हणूनच वेगळी आणि महत्त्वपूर्ण ठरते. एका वेगळ्या आणि महत्त्वाच्या विषयाला शोभणे यांनी या कादंबरीच्या निमित्ताने हात घातला आहे. शोभणे यांची कादंबरीकार म्हणून ओळख निर्माण झाली. ती त्यांच्या कोंडी या कादंबरीमुळे या कादंबरीतून १९७५ नंतरची बदलती ग्रामीण पार्श्वभूमी अत्यंत प्रत्ययकारिकतेने साकारलेली आहे. स्वातंत्र्योत्त काळात गावात टिकून असलेली पारंपारिक व्यवस्था, जातीयवाद, वर्गवाद, लोकशाही व्यवस्थेचे विकृतीकरण, जागतिकीकरणाचा गावागावावर झालेला परिणाम त्यातून निर्माण होणाऱ्या समस्या, बदलत जाणारी मानसिकता याचे चित्रण शोभणे यांनी या कादंबरीत नेमकेपणाने केले आहे. विदर्भातील खेडेगावच्या वास्तव परिस्थितीचे चित्रण साकारताना खेड्यची ढासळत जाणारी प्रतिमा शोभणे यांनी प्रभावीपणे अधोरेखित केली आहे. या कादंबरीतून साकारलेली पात्र त्या त्या गावातील माणसांच्या वृत्ती—प्रवृत्तीचे प्रतिनिधित्व करणारी आहेत. मोडकळीस आलेली कुटुंबव्यवस्था, सत्ता, संपत्ती आणि दहशत यांच्या माध्यमातून गावात निर्माण होणाऱ्या गटातटाच्या राजकारणाचे आणि यात नागवला जाणाऱ्या सर्वसामान्य शेतकरी, शेतमजूर यांचे प्रभावी चित्रण ही कादंबरी करते. गावातील मूल्यहीनतेचे दर्शन या कादंबरीतून नेमकेपणाने चित्रित होते. शहरी संस्कृतीचे आणि पाश्चात्त्य संस्कृतीचे ग्रामीण जीवनावर होणारे परिणाम त्यातून ग्रामीण माणसांचा बदलत जाणारं जगणं आणि शाळा, महाविद्यालये, दवाखाने, सहकार क्षेत्र, मनोरंजनाचे साधन, राहणीमान इत्यादी बाबतीत खेड्यातील जीवनमान सुरत कसे चालले होते. राजकारणाचा पंचायत राज पाया हे गाव होतं. किंबहुना, देशपातळीवरील राजकारणाचा पाया म्हणून या व्यवस्थेकडे पाहिलं जात होतं. हे सगळं कोंडीत आलं आहे.'' ही कोंडीच्या निर्मितीमागची भूमिका स्पष्ट करताना शोभणे यांनी अधोरेखित केलेली भूमिका अत्यंत महत्त्वाची वाटते.

या कादंबरीने शोभणेंची कादंबरीकार म्हणून ओळख करून दिली. या कादंबरीवर अनेक अभ्यासकांनी मतमतांतरे व्यक्त केले आहेत. ही बहुचर्चित कादंबरी अनेकांच्या पसंतीस उतरलेली कादंबरी म्हणून ओळखली जाते. या कादंबरीविषयी बोलताना सुप्रसिद्ध लेखक मधु मंगेश कर्णिक म्हणतात, ''प्रथमच लिहितो तुमची कादंबरी अतिशय वाचनीय व गुणसंपन्न आहे. यापूर्वी तुमचे नाव परिचयाचे असूनही असे ठळक लेखन तुम्ही केलेले स्मरणात नव्हते. परंतु कोंडीमुळे तुमचे नाव व लेखन निरंतर लक्षात राहणार आहे. मित्रवर्य जयवंत दळवी यांनी म्हटल्याप्रमाणे कोंडीला पारितोषिके, पुरस्कार यांचा लाभ होईलच एवढी तिची गुणवत्ता आहे. परंतु, कोंडी लिहिल्याचे तुम्हाला झालेले समाधान व या कादंबरीमुळे आमच्यासारख्या रसिक वाचकांना झालेला अलौकिक आनंद हे सारे कोणत्याही लौकिक बक्षिसापेक्षा मोठेच आहे.'' मराठी कादंबरीची पारंपरिक वाट न चोखाळता शोभणे यांनी नवा विचार या कादंबरीतून अभिव्यक्त केला त्यामुळेच ही कादंबरी वाचकांच्या व अभ्यासकांच्या पसंतीस उतरली असे म्हणता येईल.

प्रस्थापित समाजव्यवस्थेचे वेगळेपण मांडणारी एक महत्त्वपूर्ण कादंबरी म्हणजे चिरेबंद ही कादंबरी होय. या कादंबरीतून समाजाला भेडसावणारे प्रश्न समाजच कसा निर्माण करीत असतो त्यांचे निराकरण करण्यासाठी अनेक करते सुधारक कसे हिरहिरीने सरसावले जातात याचे मूळ सूत्र केंद्रस्थानी ठेवून शोभणे यांनी ही कादंबरी साकार केली आहे. स्त्री आणि पुरुष यांच्या विश्वाला घेऊन मानवी समाज व विवाहसंस्था कुटुंबसंस्था यांच्या रूपाने ही कादंबरी साकार होते. स्त्रियांचे अंतर्बाह्य विश्व त्याचबरोबर चिरेबंद समाजव्यवस्थेतील वैगुण्य झटकून आधुनिकतेच्या गोंडस नावाखाली प्रवेश करू पाहणाऱ्या हातून समाजाची धारणा कशी असू शकेल याचे स्वरूप दर्शन या कादंबरीतून प्रभावीपणे झाले आहे असे म्हणता येते.

वर्तमान जगण्यातील बदलाला ज्या ताकतीने रवींद्र शोभणे साकार करतात त्याच ताकदीने ते पौराणिक विषय ही अत्यंत प्रभावीपणे हाताळताना दिसून येतात. त्यांची उत्तरायण ही कादंबरी त्याचा एक

महत्त्वाचा नमुना म्हणता येईल. रामायण आणि महाभारत या पौराणिक ग्रंथाला केंद्रस्थानी ठेवून वर्तमान जीवनातील वास्तव शोभणे यांनी उत्तरायण या कादंबरीतून प्रभावीपणे साकार केले आहे. पौराणिक कालखंडात ज्या घटना वेगवेगळ्या पातळीवर घडत होत्या, त्या घटना केंद्रस्थानी ठेवून अद्भुताच्या जंजाळातून महाभारताची महाभारत कथेची मुक्तता करणे व सर्व दृष्टीने या कथेला वास्तवाच्या पातळीवर आणणे यातून या कादंबरीचे वेगळेपण व्यक्त होत असते. तरी एवढ्यावर एक चांगली कादंबरी उभारणे ही गोष्ट अवघड आहे. एक तर मुळातच महाभारत हा विषयच गुंतागुंतीचा आहे. तरी परंतु शोभणे यांनी आपल्या चिंतनातून आणि संदर्भाच्या आधारे कादंबरीला निर्दोष बनविण्याचा प्रयत्न केलेला आहे. या कादंबरीतून साकारलेली महाभारताची कथा निराळेच काहीतरी सांगू पाहते आहे, हे वाचकांच्या ध्यानात आल्याशिवाय राहत नाही. येथे लेखकाच्या आकलन आणि अभिव्यक्तीचे वेगळेपण जाणवते. मानवी जीवनाचा सनातन अर्थ विनाश आणि निर्मिती एवढाच आहे की काय या विचारापर्यंत वाचक जाऊन पोहोचतो. शोभणे यांच्या या कादंबरीविषयी नेमकेपणाने भूमिका स्पष्ट करताना त्यांनी मांडलेले मत आणि त्यावर नागनाथ कोत्तापल्ले यांनी केलेले विचारमंथन विचारात घेतले म्हणजे या कादंबरीचे वेगळेपण आणि मूल्यात्मकता लक्षात येते. ते म्हणतात, ''उत्तरायण या आपल्या बृहत्कार्य कादंबरीची भूमिका स्पष्ट करताना डॉ.रवींद्र शोभणे यांनी आपली भूमिका विस्ताराने मांडली आहे. देवत्व पूजक, विभूतिपूजा, व्यक्तिवादी, आदर्शवादी, भव्य उदात्त याचा पाठपुरावा करणाऱ्या पुनरुज्जीवनवादी दृष्टिकोनातून लिहिलेल्या आणि परिणामी लोकप्रिय झालेल्या वाङमय याविरुद्ध डॉ शोभणे यांनी ऐतिहासिक दृष्टिकोनाची कास धरून महाभारतातील व्यक्ती घटनांची तर्कसंगत तर्कनिष्ठ मांडणी करणाऱ्या विचारवंत यांच्या मार्गाने जाण्याचा प्रयत्न या कादंबरीत केला आहे.'' डॉ.नागनाथ कोतापल्ले यांनी शोभणे यांच्या उत्तरायान या कादंबरीवरती केलेले हे विवेचन कादंबरीच्या तसेच लेखकाच्या मांडणीच्या आणि वैविध्यपूर्ण अभिव्यक्तीच्या स्वरूपाला अधोरेखित करणारे आहे असेच म्हणता येईल.

रवींद्र शोभणे यांच्या जीवनविषयक जाणिवा आणि कलात्मक जाणीव हा यांचा विलक्षण मिलाफ त्यांच्या कादंबरी लेखनातून आपल्याला पहावयास मिळतो. त्यांनी बदलत्या जीवन वास्तवाकडे सूक्ष्म दृ ष्टिकोनातून पाहिले आहे. हे आपण त्यांच्या आतापर्यंतच्या कादंबरी प्रवासावरून लक्षात घेतलेले आहे. १९८०—९० नंतरच्या काळात खऱ्या अर्थाने भारतीय समाजजीवनात राजकारणाला विशेष महत्त्व प्राप्त झालेले होते. या बदलत्या राजकीय जीवन वास्तवाचा वेध घेणाऱ्या त्रिखंडात्मक कादंबरीचे लेखन करण्याचा मानस बाळगून असणाऱ्या शोभणे यांनी पडघम या कादंबरीच्या माध्यमातून भारतीय राजकीय जीवनातील चढ—उतार अत्यंत परिणामकारकतेने साकार केले आहेत. त्यांची पडघम ही कादंबरी भारतीय तत्कालीन राजकारणाचे वेगवेगळे संदर्भ अत्यंत नेमकेपणाने आणि परिणामकारकतेने साकार करते. ही कादंबरी खऱ्या अर्थाने आदर्श वाणी आणि चंगळवादी वृत्तीने मोठेपण मिळवणारे नकली प्रदर्शन यांचे सूक्ष्म दर्शन घडवून त्याग आणि भोग यातील भेद दाखवून विचार प्रवृत्त करते. राजकारणाचे मानवी समाजावरती होणारे वेगवेगळे परिणाम आणि त्यातून मानवी समाजाचा वेगवेगळे स्तर आहेत. तसेच वृत्ती—प्रवृत्ती होत जाणारे बदल त्याचबरोबर जातीय, धार्मिक अशा निर्माण होणाऱ्या समस्या याची व्यामिश्रता या कादंबरीत साकार झालेली आहे. पडघम ही कादंबरी मूल्यशोधाची बृहत गाथा अशीच आहे, असे कादंबरीचे अभ्यासक डॉ.किशोर सानप यांचं हे मत आहे. मानवी जीवनाच्या आदिम कोपऱ्यांना स्पर्श करीत पडघम मधील पात्रे समाजजीवनातील मूल्यांचा भाव वाचकांच्या मनात जागवतात. पडघम या कादंबरीला परिसर हा मुख्यत्वे विदर्भाची राजधानी असलेल्या नागपूरचा आहे. नागपूरच्या वर्तमानपत्रीय, सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय जीवनातील घडामोडींचा विस्तृत तपशील पडघम मध्ये असल्यामुळे वास्तवातील काही व्यक्ती सोडल्यास या कादंबरीतील इतर व्यक्ती घटना, प्रसंग पूर्णतः काल्पनिक आहेत आणि त्यात लेखकाच्या अभिव्यक्तिचे खऱ्या अर्थाने यशच आहे असे म्हणता येईल. शोभणे म्हणतात त्याप्रमाणे लेखकाच्या लेखन कृतीचा हा प्रवास तुम्हा सगळ्यांना ठाऊक असतो. तथापि, तो पुन्हा या ठिकाणी सांगण्याचे प्रयोजन थोडे वेगळे आहे. हे अनुभव बीज जेव्हा साकारत असते, त्या अनुषंगाने लेखकाचे वाचन मनन चिंतन सुरू असते. त्याच्यासोबतच आपण ज्या काळात वावरत असतो, त्या काळाचा आणि सभोवतालच्या परिस्थितीचा एक गहिरा परिणाम त्यावर होत असतो. किंबहुना, सभोवतालच्या परिस्थितीचा परिणाम लेखकालाही टाळता येत नाही. जिथून या प्रवासाची सुरुवात होते तिथेच पुन्हा यावे लागते. म्हणजे

अनुभवाची बीज धारणा सभोवतीच्या परिस्थितीतच होते आणि कलाकृतीच्या निर्मितीप्रक्रियेत ही लेखन प्रक्रियेतही सभोवतीची परिस्थितीच प्राधान्याने उभी राहते. म्हणजेच लेखक हा समकालीन जगण्याशी संवाद साधत असतो हे यावरून अधिक स्पष्ट होते.

जागतिकीकरणाने जसा संबंध मानवी जीवनात बदल घडविला आहे, तसाच ग्रामीण जीवनात ही परिणामकारक बदल घडला आहे. हे नाकारून चालणार नाही. ग्रामीण स्तरातील जीवन हे अमुलाग्र स्वरूपात बदललेले आहे. या बदलत्या ग्रामीण जीवनाचे साक्षीदार असणारे शोभणे आपल्या पांढर या कादंबरीतून ग्रामीण वास्तवाचे अनेक पदर परिणामकारकतेने साकार करतात. त्यांची पांढर ही कादंबरी दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर उभी राहिलेली एक अत्यंत महत्त्वपूर्ण कादंबरी आहे. पांढर कादंबरीतून दुष्काळाने गावची झालेली वाताहत आणि त्यामुळे मानवी जीवन कशा पद्धतीने उद्ध्वस्त होत गेले याचे मनोहारी दर्शन या कादंबरीतून घडते. खरेतर वास्तवाच्या पलीकडे जाऊन शोधणे हे दुष्काळाची परिणामकारकता रेखाटू पाहताहेत. विदर्भात सातत्याने दुष्काळामुळे होत जाणारी ग्रामीण माणसांची होरपळ हा काही नवीन विषय नाही. परंतु दुष्काळ हा किती भयावह असू शकतो आणि त्यामुळे मानवी समाज कशा पद्धतीने विस्थापित होऊन जातो हे शोभणे यांनी अत्यंत नेमकेपणाने या कादंबरीतून उभे केले आहे. या कादंबरीत जी समस्या अधोरेखित केली आहे ती सातत्याने पाऊस न पडल्यामुळे दुष्काळाचे संकट गावावर ओढावते. दुबार पेरणी करूनही वाया जाते. सारेच गावकरी हवालदिल होतात. हळूहळू शेतीबरोबरच पिण्यासाठी पाणी मिळणेही दुरापास्त होऊन जाते आणि माणसे जगायला म्हणून बाहेर पडतात. गावात शेती उरत नाही. शेतमजूर नाही. प्यायला पाणी नाही अशा अवस्थेत जगणेच अशक्य होऊन बसते. तेव्हा एक—एक करून माणसे गाव सोडून जातात आणि बघता बघता गाव उजाड होऊन जाते. कादंबरीला समजून घेणारा वाचक ही या कादंबरीतील कथानकाबरोबर मनानेही उजाड होत जातो, हेच शोभणे यांचे खरे यश आहे असेच म्हणता येईल. श्रेष्ठ साहित्यकृतीचा पारा या सगळ्यात शोभणे यांच्या लेखणीतून कुठेतरी साकार होतोय हे दिसून येते.

## समारोप :

सरतेशेवटी सारांश रूपाने विचार करत असताना हे लक्षात येते की १९९० नंतरच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय मूल्यांची आणि परिस्थितीची झालेली पडझड आणि त्यातून संवेदनशील मनाची झालेली अभिव्यक्ती या प्रवासात रवींद्र शोभणे यांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. शोभणे यांनी कादंबऱ्यातून आपला वैशिष्ट्यपूर्ण ठसा उमटविलेला आहे. विदर्भातील ग्रामीण वास्तवाचा वेध घेणारे एक महत्त्वपूर्ण लक्षणीय लेखक म्हणून शोभणे हे विशिष्ट चर्चिले गेले आहेत. कथा, कादंबरी, समीक्षा अशा सर्वच क्षेत्रात शोभणे यांनी महत्त्वपूर्ण भर घातली आहे. महत्त्वाचे म्हणजे त्यांच्या प्रत्येक कथा—कादंबऱ्यातून जीवनाविषयीची सूक्ष्म दृष्टी दिसून येते.

## संदर्भ :

१. प्रवाह, रवींद्र शोभणे, म. रा. सा.सं. मंडळातर्फे प्रकाशित, १९८३.
२. रक्तध्रुव, रवींद्र शोभणे, विजय प्रकाशन नागपूर, दु.आ. १९८९.
३. कोंडी, रवींद्र शोभणे, देशमुख आणि कंपनी पुणे, दु. आ. १९९१.
४. चिरेबंद, रवींद्र शोभणे, देशमुख आणि कंपनी, पुणे, २००१.
५. उत्तरायण, रवींद्र शोभणे, देशमुख आणि कंपनी पुणे, २००१.
६. पडघम, रवींद्र शोभणे, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, २००७.
७. पांढर, रवींद्र शोभणे, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई २००९.
८. सत्यापासून साहित्यापर्यंत, संपादन, वंदना महाजन, विजय प्रकाशन, नागपूर, २०१५.
९. लक्षवेधी कादंब**ऱ्या**, डॉ.चंद्रकांत बांदिवडेकर, हर्मिस प्रकाशन पुणे, २०१२.
१०. कादंबरीचा आशयवेध, डॉ.आशा सावदेकर, विजय प्रकाशन, नागपूर, २०१३.